माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग

दुर.क्र.०२५३ २२३२७६४ पिनॅकल मॉल, चौथा मजला, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार दाखल द्वितीय अपील**

**क्रमांक : द्वितीय अपील -२१०/२०२४/नाशिक**

| द्वितीय अपील कर्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
|---|---|---|
| विजय हिरालाल जैन रा.८२३-अ, डायमंड प्लाझा, दत्त मंदिर रोड, मनमाड, ता. नांदगाव, जि.नाशिक ४२३१०४ | उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, मालेगाव यांचे कार्यालय ता. मालेगाव, जि. नाशिक | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मालेगाव यांचे कार्यालय ता. मालेगाव, जि. नाशिक |

**सुनावणीचा/आदेशाचा दिनांक : १७/५/२०२४**

अपिलार्थी यांनी दि.०६/०१/२०२४ रोजीच्या अर्जान्वये " माहिती अप्राप्त, प्रथम अपीलीय अधिकाऱ्यानी सुनावणी घेतली नाही " असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे.

२. सदर द्वितीय अपिलाच्या सुनावणीस सर्व पक्षकार अनुपस्थित आहेत .

३. अपिलार्थी यांनी दिनांक १५/५/२०२३ च्या मूळ अर्जान्वये वर नमूद केलेल्या जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करून, खालीलप्रमाणे माहिती मिळण्याची विनंती केली आहे.

क) दिनांक १/१/२०२२ ते आजअखेर कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम मालेगाव यांची शासकीय रोजनिशी मिळावी.

४. तसेच या प्रकरणात अपिलार्थी यांनी दिनांक १२/८/२०२३ प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे अधिनियमाच्या कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले आहे.

४. सुनावणीदरम्यान, उपलब्ध कागदपत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १४/७/२०२३ च्या पत्रान्वये मागितलेली माहिती वैयक्तिक स्वरूपाची असल्याने आपणास देता येणार नाही असे कळविले आहे. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक २७/९/२०२३ रोजी प्रथम अपील अर्जावर निर्णय पारित केला असून त्यामध्ये “मा सर्वोच्च न्यायालयाने स्पेशललिव्ह पीटीशन २७७३४/२०१२ मध्ये दिनांक ३/१०/२०१२ रोजी दिलेला निर्णय तसेच जि माहिती उघड केल्याने कोणतेही जनहित साध्य होत नाही अशी माहिती उघड करण्याचे बंधन जन माहिती अधिकार्यावर नाही.” असे नमुद करून प्रथम अपील निकाली काढलेले आहे. प्रथम अपीलीय अधिकाऱ्यानी पारित केलेला निर्णय योग्य आहे.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

आदेश

प्रस्तुतचे द्वितीय अपिल निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त, नाशिक खंडपीठ

आ-१४७१

28 MAY 2024